सकाळ एप्रिल १८, २०१८ पान नं. ८

# ई सर्टिफिकेट कोर्स बंधनकारक

## नवीन बँक कर्मचाऱ्यांसाठी धोरण; आरबीआयकडून सर्व बँकांना निर्देश

पुणे, ता. १७ : देशातील सर्व सार्वजनिक, सहकारी आणि खासगी व्यावसायिक बँकांमधील विविध विभागांत एक एप्रिलनंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांचा 'ऑनलाइन ई सर्टिफिकेट कोर्स' करणे भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) बंधनकारक केले आहे, अशी माहिती 'राष्ट्रीय बँक व्यवस्थापन संस्थे'चे (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट-एनआयबीएम) संचालक डॉ. के. एल. धिंग्रा यांनी मंगळवारी दिली. देशात हा कोर्स सुरू करण्यासाठी अधिस्वीकृती मिळालेली 'एनआयबीएम' ही पहिली संस्था ठरली असल्याचेदेखील त्यांनी या वेळी सांगितले.

भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) या संदर्भात नुकतेच परिपत्रक प्रसिद्ध करून संबंधित सर्व बँकांना याबाबत निर्देश दिले आहेत. बँक क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानावर आधारित दैनंदिन व्यवहार केले जात आहेत; तसेच सर्व कर्मचाऱ्यांना व्यवस्थापन कौशल्य आणि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळणे आवश्यक असल्यामुळे सहा महिन्यांचा ऑनलाइन कोर्स करणे बंधनकारक केले आहे.

या संदर्भात डॉ. धिंग्रा म्हणाले, ''भारतीय बँक असोसिएशन (इंडियन बँक्स असोसिएशन-आयबीए) यांनी 'आरबीआय'च्या निर्देशानुसार 'एनआयबीएम'सह अन्य दहा संस्थांना हा कोर्स सुरू करण्यासाठी परवानगी दिली आहे. 'बँकेतील क्रेडिट व्यवस्थापन, जोखीम व्यवस्थापन, कोशागार व्यवस्थापन, खाते व लेखापरीक्षण आणि किरकोळ क्रेडिट व्यवस्थापन' या विषयांमध्ये हा कोर्स असणार आहे. नोंदणी, दृकश्राव्य व्याख्याने, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि परीक्षा असे या कोर्सचे स्वरूप आहे. सर्व प्रक्रिया ऑनलाइन होणार आहेत. 'एनआयबीएम'द्वारे हा कोर्स सुरू झाल्यानंतर एक हजार कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली आहे.''

**“ राष्ट्रीय बँक व्यवस्थापन संस्थेकडून (एनआयबीएम) सध्या बँक व्यवस्थापन विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (पीजीडीबीएम) शिकविला जातो. सुमारे ९० विद्यार्थी दरवर्षी हा अभ्यासक्रम पूर्ण करतात. या अभ्यासक्रमाला 'मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन'चा दर्जा द्यावा, असा प्रस्ताव 'ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन'ला (एआयसीटीई) पाठविला आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात त्याला अंतिम मान्यता मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर 'एमबीए इन बँक मॅनेजमेंट' असे अभ्यासक्रमाचे नाव असेल.**

**- डॉ. के. एल. धिंग्रा,** संचालक, एनआयबीएम, पुणे

### पदवी प्रदान आज

**'राष्ट्रीय बँक व्यवस्थापन संस्थे'चा १४ वा पदवी प्रदान कार्यक्रम बुधवारी (ता. १८) आहे. कोंढवे खुर्द येथील संकुलात होणाऱ्या या कार्यक्रमात आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर एन. एस. विश्वनाथन यांच्या हस्ते पदवी प्रदान होणार आहे.**